<u>विशेष दिवाणी दावा नं.१९८/२०२३(नि.९५ लगत)</u>

**(प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्याविरुद्ध एकतर्फा चालु असल्याने उलटतपास नाही.)**

**उलटतपास प्रतिवादी क्रं.४ व ५ तर्फे ॲड. ए. पी. बोत्रे यांचेतर्फे**

१. माझे पदवीचे शिक्षण झालेले आहे. मी वाई अर्बन बॅंकेत नोकरीस होतो. मी लहानपणापासुन गणपती आळी, वाई येथेच रहातो. हे म्हणणे खरे आहे की सर्व वादी हे देखील गणपती आळी, वाई येथेच राहतात. हे म्हणणे खरे आहे की वादी व माझी पहिल्यापासुन ओळख आहे. आमचे संबंध साधारण आहेत. आमच्यामध्ये वाद नाहीत. ते त्यांच्या व्यवहाराची मला माहिती देणेइतपत आमचे संबंध नाहीत. निमित्त असल्यास माझे त्यांच्याकडे जाणे-येणे असते. हे म्हणणे खरे नाही की मी त्यांच्या अडीअडचणींना धावुन जातो. मला दाव्याची संपुर्ण माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मला दावा मिळकतीची संपुर्ण माहिती नाही. मला दावा मिळकतीच्या चतु:सिमा सांगता येणार नाहीत व आजुबाजुचे मालक कोण आहेत हे देखील सांगता येणार नाही. आजरोजी दावा मिळकतीत कोणते पीक आहे हे मला सांगता येणार नाही. ७/१२ उताऱ्यावर निंबाळकर व अहिरेकर यांची नावे आहेत. त्यांची पुर्ण नावे मला सांगता येणार नाही. मी चंद्रकांत निंबाळकर अथवा त्यांची बहीण अहिरेकर यांना कधीही बघितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यांनी काय व्यवहार केले याची मला वैयक्तीक माहिती नाही. मला जयवंत पवार म्हणजेच प्रतिवादी क्रं.३ याचेबद्दल माहिती आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याबद्दल मला व्यक्तीश: माहिती नाही. मला जमीन नवीन शर्तीची किंवा जुन्या शर्तीची आहे याची माहिती नाही. जयवंत पवार याने वादीबरोबर केलेल्या व्यवहाराव्यतिरीक्त इतर व्यवहारांची मला माहिती नाही. प्रतिवादी क्रं.४ व ५ यांच्याबरोबर जयवंत पवार याने दावा मिळकतीबाबत काय व्यवहार केले याची मला माहिती नाही. दावा मिळकत सध्या पडीक आहे किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीबद्दल मला व्यक्तीश: माहिती नाही. सदर दाव्याव्यतिरीक्त आणखी काही कोर्ट कचेऱ्या झाल्या आहेत का याची मला माहिती

नाही. मुळ मालकांनी जाहीर नोटीस व व्यक्तीशः नोटीस देवुन जयवंत पवार यास करुन दिलेले मुखत्यारपत्र रद्द केले होते याची मला माहिती नाही. जयवंत पवार याने अनेक लोकांना व्यवहारामध्ये फसवले आहे याची मला माहिती नाही. वादीच्या लाभात दावा मिळकतीचे साठेखत करुन देण्यापुर्वी जयवंत पवार याने प्रतिवादी क्रं.४ व ५ यांना दावा मिळकत विक्री करण्याचे कबुल केले होते व त्यापोटी विसारपावती केल्याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की महामार्ग झालेला असल्यामुळे गावातील मिळकतींच्या किंमती बऱ्याच वाढलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की धरणावरुन कॅनॉल झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की धरणामुळे वादींना जमीन मिळावी अशी लालुच निर्माण झाली आहे. प्रतिवादी क्रं.४ व ५ हे कुठे राहतात याची मला माहिती नाही. मी सन १९८० मध्ये बँकेत नोकरीस लागलो. त्यांचे आमच्या बँकेत व्यवहार सुरू झाल्यापासुन माझी वादींबरोबर ओळख आहे. त्यांचे व्यवहार आमच्या बँकेत मी आल्यापासुन सुरू होते. हे म्हणणे खरे आहे की तेंव्हापासुन माझी वादींबरोबर ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की वादींबरोबर माझे चांगले संबंध असल्याने त्यांना मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी व जयवंत पवार यांच्यामध्ये कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की कोणतेही साठेखत झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की कोणताही संगणीकृत व्यवहार वादी व जयवंत पवार यांच्यामध्ये झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की वादींचा प्रतिवादी क्रं.१ व २ यांच्याबरोबर प्रत्यक्ष व्यवहार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : १३.०३.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वाई.